आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१३ जून २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- नीट परीक्षेतल्या १ हजार ५६३ विद्यार्थ्यांचे ग्रेस मार्क रद्द करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय / त्यांना २३ जूनला पुन्हा परीक्षा देता येणार
- राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुनेत्रा पवार यांना राज्यसभेवर बिनविरोध निवडून येण्याचा मार्ग मोकळा
- मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांचं उपोषण स्थगित /सगेसोयरे कायद्याबाबत एका महिन्यात निर्णय घेण्याचं सरकारचं आश्वासन

**आणि**

- नागपुरात स्फोटकांच्या कंपनीत झालेल्या स्फोटात ६ जणांचा मृत्यू

**<><><><><>**

नीट परीक्षेतल्या १ हजार ५६३ विद्यार्थ्यांचे ग्रेस मार्क रद्द करण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. ग्रेस मार्कशिवाय मिळालेले गुण या विद्यार्थ्यांना कळवले जातील आणि त्यांना २३ जून रोजी पुन्हा परीक्षा देण्याचा पर्याय उपलब्ध करुन देणार असल्याची माहिती केंद्र सरकारनं आज सर्वोच्च न्यायालयात दिली. ज्या विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा द्यायची नसेल त्यांचे ग्रेस मार्कांशिवाय मिळालेले गुण ग्राह्य धरले जातील. २३ जून रोजी होणाऱ्या परीक्षेचा निकाल ३० जून रोजी जाहीर केला जाईल, असंही सरकारनं आज सांगितलं. ग्रेस गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या गुणांची पडताळणी करण्यासाठी सरकारनं एक समिती स्थापन केली आहे. त्या समितीच्या शिफारसींनुसार सरकारनं हा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी G-7 शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी आज ईटलीला रवाना झाले. भारत-इटली धोरणात्मक भागीदारी मजबूत करण्यासाठी तसंच भारत-प्रशांत आणि भूमध्यसागरीय प्रदेशांमध्ये सहकार्य वाढवण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे, असं आश्वासन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी इटलीला जाण्यापूर्वी दिलं. इटलीच्या प्रधानमंत्री जॉर्जिया मेलोनी यांच्या निमंत्रणावरून ते G-7 शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी जात आहेत. यानिमित्तानं इटलीला भेट होत असल्याचा मला आनंद आहे, असंही मोदी म्हणाले. या परिषदेत, कृत्रिम बुद्धिमत्ता, ऊर्जा, आफ्रिका आणि भूमध्य सागरावर लक्ष केंद्रित केलं जाईल, असंही त्यांनी सांगितलं. भारताच्या अध्यक्षतेखाली झालेल्या G-20 शिखर परिषदेचे परिणाम आणि आगामी G-7 शिखर परिषद यांच्यात अधिक समन्वय आणण्याची आणि दक्षिण विश्वासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या मुद्द्यांवर विचारविनिमय करण्याची ही संधी असेल, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

राज्यसभा निवडणुकीसाठी बिनविरोध निवडून येण्याचा राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुनेत्रा पवार यांचा मार्ग मोकळा झाला आहे. अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत त्यांच्याशिवाय इतर कुणीही अर्ज भरलेला नाही. उद्या अर्जाची छाननी होईल, त्यानंतर त्यांच्या बिनविरोध निवडीची घोषणा होऊ शकते.

प्रफुल्ल पटेल यांनी कालावधी पूर्ण होण्याआधीच राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा दिल्यानं ही निवडणूक होते आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संसदीय मंडळाच्या बैठकीत बुधवारी रात्री त्यांच्या नावावर सहमती झाली, त्यांच्या उमेदवारीवरुन कुणीही नाराज नाही, अशी माहिती प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिली.

दरम्यान, मुंबई शिक्षक मतदारसंघातून शिवसेनेने शिवाजी शेंडगे यांना पाठिंबा जाहीर केला आहे.

<><><><><>

काँग्रेस राज्यातल्या सर्व विधानसभा मतदारसंघात संघटन बांधणीवर भर देत असून भाजपाला सत्तेतून हद्दपार करणं हेच आपलं उद्दिष्ट असल्याचं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आज नागपुरात वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. विधानसभा निवडणुकीत गुणवत्तेनुसार जागावाटप झालं तर चांगला निकाल लागू शकतो. काँग्रेसनं सर्व मतदारसंघात संघटन बांधणी केली तर मित्रपक्षांनाही याचा फायदा होईल, असं पटोले म्हणाले.

<><><><><>

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मंत्रालयात वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली. राज्यात सुरू असलेली आणि प्रस्तावित विकासकामं वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश यावेळी पवार यांनी अधिकाऱ्यांना दिले. या बैठकीत अजित पवार यांनी राज्यातल्या विविध उपक्रम आणि प्रकल्पांचा आढावा घेतला. यावेळी महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे, राज्याचे मुख्य सचिव नितीन करीर उपस्थित होते.

<><><><><>

वरोरा-भद्रावती विधानसभा मतदारसंघातल्या आमदार प्रतिभा धानोरकर यांनी आज विधानसभा सदस्य पदाचा राजीनामा दिला. चंद्रपूरच्या खासदार म्हणून विजयी झाल्यानं त्यांनी आमदारकीचा राजीनामा दिला आहे.

<><><><><>

आषाढी एकादशी निमित्त संत गजानन महाराजांची पालखी बुलढाणा जिल्ह्यातल्या शेगाव इथून पंढरपूरकडे आज सकाळी रवाना झाली. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याणमंत्री पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी शेगाव इथं संत श्री गजानन महाराजांच्या समाधीचं दर्शन घेतलं आणि पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या वारकऱ्यांशी संवाद साधला. भाजपा शिवसेना महायुतीच्या कार्यकर्त्यांकडून जाधव यांचा सत्कार करण्यात आला.

**<><><><><>**

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी आंतरवली सराटी इथं सुरू असलेलं आपलं उपोषण स्थगित केलं आहे. मंत्री शंभुराज देसाई, संदिपान भुमरे यांनी मनोज जरांगे यांची भेट घेऊन त्यांच्या मागण्यांवर तोडगा काढण्याचं आश्वासन दिलं आहे. सरकार सग्या सोयऱ्यांच्या कायद्याबद्दल सकारात्मक असून यावर एका महिन्यात निर्णय घेण्यात येईल, असं शंभुराज देसाई यांनी उपस्थित आंदोलकांना सांगितलं. तर सरकार १३ जुलैपर्यंत आपल्या मागण्या पूर्ण करेल, अशी अपेक्षा मनोज जरांगे यांनी व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

नागपुरात धामणी परिसरात स्फोटकांच्या कंपनीत झालेल्या स्फोटात ६ जणांचा मृत्यू झाला असून ३ जण जखमी झाले आहेत. चामुंडा एक्स्प्लोझिव्ह कंपनीत दुपारी ही दुर्घटना घडली. पोलीस आणि स्थानिक बचाव पथक याठिकाणी मदत कार्य करत आहे. मृतांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आर्थिक मदत देण्याचं आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिलं आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

<><><><><>

एसटी अर्थात राज्य परिवहन महामंडळामध्ये काम करणाऱ्या चालक-वाहकापासून अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांच्या विनंती बदल्या यापुढे संगणकीय प्रणालीव्दारे ऑनलाईन पध्दतीने होणार आहेत. महामंडळानं आज एका पत्रकाद्वारे ही माहिती दिली. यामुळे बदल्यांबाबतचे विविध आक्षेप कमी होणार असून सेवा जेष्ठतेनुसार सर्व कर्मचाऱ्यांना समान न्यायाची हमी शक्य होणार आहे, असा दावा महामंडळानं केला आहे.

<><><><><>

आवक घटल्याने कांद्याच्या दरात पाच ते दहा रुपयांची वाढ झाली आहे. नवी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याची २५ ते ३० रुपये किलो दराने विक्री होत आहे. कांद्याचा साठा कमी झाल्यामुळे आवक घटली असून त्याचा परिणाम किमतीवर झाल्याचं कांदा व्यापाऱ्यांनी सांगितलं.

<><><><><>

मिफ अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात यंदा २१ मराठी चित्रपट, लघुपट आणि माहितीपटांचा समावेश आहे. शनिवारपासून सुरू होणाऱ्या या महोत्सवात प्रेक्षकांना या चित्रपटांचा आस्वाद घेता येईल. आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सार्वनिक कौर यांचा अगेन्स्ट द टाइड हा चित्रपट आहे. तर राष्ट्रीय स्पर्धेत बिगारी कामगार, भैरवी, भगवान, गुंतता हृदय हे, वूमन ऑफ बिलियन, फेरा, आजोबांचं घर, वैद्यराज, अद्वैताच्या पाऊलखुणा, सहस्त्रसूर्य सावरकर, डोमकावळा - द रावन, भेड चाल, म्हातारा डोंगर हे लघुपट-माहितीपट पाहता येतील. विविध विद्यार्थ्यांचे ७ मराठी लघुपट, माहितीपट या महोत्सवात आहेत.

<><><><>

घाटकोपर होर्डिंग दुर्घटनेतल्या  मृतांच्या नातेवाईकांना अधिकची मदत मिळवून देण्यासाठी शासन प्रयत्न करणार असल्याचं  मदत आणि  पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांनी मंत्रालयात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत आज सांगितलं. या दुर्घटनेतील १७ मृतांच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून पाच लाख रुपये आणि राज्य आपत्ती व्यवस्थापन निधीतून चार लाख रुपये असे एकूण प्रत्येकी ९ लाख रूपयांचे सहाय्य करण्यात आलं  आहे.

दुर्घटनेत जे आपदग्रस्त सात दिवसापेक्षा अधिक वेळ रूग्णालयात उपचार घेत होते, त्यांना प्रत्येकी १६ हजार रूपये  प्रमाणे एकूण २ लाख ८ हजार रूपयांचं अर्थ सहाय्य करण्यात आलं आणि त्यापेक्षा कमी कालावधीसाठी उपचार घेणाऱ्या रूग्णांना प्रत्येकी ५ हजार ४०० रूपये प्रमाणे सहाय्य  देण्यात आलं आहे.

<><><><>

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज दिवसअखेर २०४ अंकांची वाढ झाली आणि तो  ७६ हजार ८११ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ७६ अंकांची वाढ नोंदवत २३  हजार ३९९ अंकांवर बंद झाला.

<><><><>

आयपीएल आणि इतर क्रिकेट सामन्यांदरम्यान बेटींग प्रकरणी ईडी अर्थात सक्तवसुली संचलनालयानं काल मुंबई आणि पुण्यात छापे टाकले. फेयर प्ले या ॲप आणि वेबसाइटशी निगडीत १९ ठिकाणांवर हे छापे टाकले.

<><><><>

जागतिक कनिष्ठ बुद्धीबळ अजिंक्यपद स्पर्धेचं विजेतेपद दिव्या देशमुखनं पटकावलं आहे. ही स्पर्धा जिंकणारी ती चौथी भारतीय महिला ठरली आहे. ११ पैकी १० गुण मिळवून तिनं हे विजेतेपदक पटकावलं.

**<><><><><>**

नैऋत्य मोसमी पाऊस पुढच्या तीन चार दिवसात राज्याच्या आणखी काही भागात दाखल होण्यासाठी परिस्थिती अनुकूल आहे.

गेल्या चोवीस तासात कोकणात बऱ्याच ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी, तर विदर्भ आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात मुसळधार पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात काही ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.